सकाळ

# 'केबीपी'मध्ये सायबर सुरक्षा मार्गदर्शन



सातारा : सायबर सुरक्षाविषयक पत्रकाद्वारे माहिती देताना उपस्थित मान्यवर व विद्यार्थी.

**सातारा, ता. २१ :** कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च वर्ये येथील बीसीए विभाग, क्विक हिल फाऊंडेशन व महाराष्ट्र पोलिस सायबर सेल यांच्या समन्वयाने सुरू केलेले सायबर गुन्हे रोखण्यासाठी सायबर सुरक्षा सामाजिक कार्याची सुरुवात करण्यात आली आहे.

केबीपी मॅनेजमेंटने आयोजित सायबर जागरूकता दिवस या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेची माहिती दिली, तसेच पथनाट्य अशा विविध प्रकारांतून त्यांनी ही माहिती युवकांपर्यंत पोचविण्यासाठी जनजागृती सुरू केली आहे. प्रभात फेरीत सायबर सिक्युरिटी संबंधित नारे देण्यात आले. रॅली व पथनाट्यातून लोकांना इंटरनेट हॅकर्सचे शिकार होण्यापासून वाचवूया, आपल्याला आलेला ओटीपी आणि आपला आधार नंबर कोणालाही शेअर करू नये, असे संदेश नागरिकांपर्यंत पोचविले. या कार्यक्रमाची सांगता सायबर सुरक्षेच्या प्रतिज्ञेने केली. यामध्ये आपण सर्वांनी इंटरनेट वापरताना सर्व नियमांचे पालन करूया, कोणत्याही आमिषाला बळी पडणार नाही, अशी प्रतिज्ञा केली. यामध्ये प्रमुख पाहुणे ॲड. आदिती कासार, इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. बी. एस. सावंत आणि कॉम्प्युटर डिपार्टमेंटचे विभाग प्रमुख डॉ. आर. डी. कुंभार व क्विक हिलसाठी बीसीए डिपार्टमेंटचे समन्वयक विकास चव्हाण उपस्थित होते.

Satara, Main
22/10/2022 Page No. 2